# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

## प्रेसनोट दिनांक १९/०७/२०२२

## अल्पवयीन मुलावर लैंगीक अत्याचार करुन फरार झालेल्या अनोळखी आरोपीचा सलग १६ तास शोध घेऊन अटक

### (वाकड पोलीस ठाणे तपास पथकाची कारवाई)

--- oo ---

दिनांक १७/०७/२०२२ रोजी १७/३० वाजताचे सुमारास बापुजीबुवा उदयान, थेरगांव, पिं.चिं., पुणे येथे खेळणाऱ्या एका ०७ वर्षाच्या अल्पवयीन मुलास चॉकलेट देण्याचे बहाण्याने अज्ञात इसमाने नेऊन सदर मुलासोबत अनैसर्गिक संभोग करुन पळुन गेला म्हणुन त्याचे पालकाने दिलेल्या तक्रारीवरुन वाकड पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ६१८/२०२२ भादंवि कलम ३७७, ३६७, ३०६ लैगिंक अपरांधा पासुन बालकांचे संरक्षण अधिनियम सन २०१२ चे कलम ४,६ प्रमाणे गुन्हा नोंद झाला आहे.

घडलेले गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन मा. श्री. अंकुश शिंदे सो. पोलीस आयुक्त,, पिंपरी चिंचवड यांनी श्री. सत्यवान माने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वाकड पोलीस स्टेशन यांना गुन्ह्याचे योग्य प्रकारे अन्वेषण करुन तात्काळ अज्ञात आरोपींचा शोध घेऊन आरोपी अटक करणेबाबत आदेशित केले. त्यानुसार श्री. सत्यवान माने यांनी त्यांचे अधिनस्थ तपास पथकातील सपोनि श्री. संतोष पाटील, सपोनि श्री. संभाजी जाधव व अंमलदार यांना सुचना दिल्या.

वाकड पोलीस ठाणे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांच्या वेगवेगळ्या टिम तयार करुन पिडीत मुलावर अत्याचार करणाऱ्या अनोळखी आरोपीचा शोध घेणेकरिता पिडीत मुलावर अत्याचार झाले ठिकाणाच्या आजुबाजुच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज चेक करण्याबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे सीसीटीव्ही फुटेज चेक करुन संशयित इसमाचा सीसीटीव्ही फुटेज चेक करुन माग काढण्याकरीता रात्री अविरतपणे टिम यांनी सीसीटीव्ही असणारे दुकाने, घरे यांचे मालकांना विनंती करुन सीसीटीव्ही फुटेज पाहणी करुन फुटेज व्दारे आरोपी राहत असलेला परिसर निश्चित करुन सापळा रचुन संशयीत आरोपी शोध घेऊन ताब्यात घेतला. ताब्यात घेतलेल्या इसमाचे नाव अलिम मुसा शेख, वय २७ वर्षे, रा. साई मल्हार कॉलनी, तापकिर चौक, काळेवाडी, पुणे मुळगाव शिरुर ताजमल, ता. अहमदपुर, जि. लातुर असे असल्याचे सांगितले आहे. दाखल गुन्ह्याचे तपासकामी आरोपीस दिनांक १८/०७/२०२२ रोजी अटक करण्यात आली असून आरोपीकडे अधिक तपास करीत आहोत.

सदर आरोपी याचेवर पिंपरी पोलीस ठाणे येथे गु.र.नं. २९२/२०२२ एन.डी.पी.सी. ॲक्ट कलम ८(क), २७ भादंवि कलम ३४ प्रमाणे गुन्हा दाखल असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. सदर आरोपीबाबत सीसीटीव्ही फुटेज व्यतिरीक्त इतर कोणताही पुरावा नसल्याने तपास पथकातील टिमने १६ तास अविरतपणे सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करीत आरोपीचा शोध घेतला आहे.

सदरची कारवाई मा. श्री. अंकुश शिंदे सो. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा. श्री. संजय शिंदे सो. अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा. श्री. आनंद भोईटे सो, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, पिंपरी चिंचवड, मा. श्री. श्रीकांत डिसले सो. सहा. पोलीस आयुक्त, वाकड विभाग, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली डॉ. श्री. सत्यवान माने, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, वाकड पोलीस ठाणे, श्री. रामचंद्र घाडगे, श्री. संतोष पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे), सपोनि. संतोष पाटील, सपोनि. संभाजी जाधव, पोउपनि अवधुत शिंगारे, पोलीस अंमलदार बिभीषण कन्हेरकर, बाबाजान इनामदार, राजेंद्र काळे, वंदु गिरे, दिपक साबळे, स्वप्नील खेतले, बंडु खाडे, अतिश जाधव, प्रमोद कदम, विक्रांत चव्हाण, अतिक शेख, प्रशांत गिलबीले, तात्यासाहेब शिंदे, भास्कर भारती व अजय फल्ले यांनी मिळुन केली आहे.

**(आनंद भोईटे)**
पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ २, पिंपरी चिंचवड